Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## प्रकरण ३७ :

# प्रतिकारशक्ती कमतरता

प्रतिकार शक्ती ही आजाराला तोंड देण्यासाठीची एक महत्त्वाची यंत्रणा आहे तिच्यात दोष निर्माण झाला असल्यास लहान मुलांना अनेक जंतुसंसर्गना तोंड द्यावे लागते. अशा अनेक प्रतिकारशक्ती कमतरतेच्या आजारांमध्ये काय काळजी घ्यावी हे ह्या प्रश्नोत्तराच्या आधारे पाहूया


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

अनुवाद : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

पुनरावलोकन : डॉ. मोहन पाटील

श्री. अविनाश शिरगावकर

*Convener:* **Anju Gupta**

*Members:* **Ambreen Pandrowala, Baldev S Prajapati, Rupam Das**

*Reviewer:* **S Sitaraman**




१) इम्युनोडेफिशियन्सी म्हणजे काय? ती कशामुळे होते? एका मुलाला लागण झाल्यास ही प्रतिकारशक्तीची कमतरता दुसऱ्या मुलाला होऊ शकते का? काय केल्याने ते टाळता येते?

२) माझ्या मुलाला वरचेवर जंतुसंसर्ग होत असतो. त्याची प्रतिकारशक्ती नीट काम करत नाही या गोष्टीची मी काळजी करावी का?

३) माझ्या मुलाला कोणत्या प्रकारचे जंतुसंसर्ग होऊ शकतात? मी त्याला / तिला हॉस्पिटलमध्ये कधी घेऊन जावे? पालक या नात्याने मी हे जंतुसंसर्ग टाळण्यासाठी काय करू शकतो?

४) माझ्या प्राथमिक प्रतिकारशक्ती अक्षम असलेल्या (PID) मुलाला मी शाळेत पाठवू शकतो का?

५) माझा मुलगा घराबाहेर खेळू शकेल का?

६) आमच्या मुलाला आम्ही सुट्टीसाठी बाहेर घेऊन जाऊ शकतो का? त्यासाठी आम्हाला काय काळजी घ्यावी लागेल?

७) माझ्या मुलाच्या लसीकरणाबाबत मी काय करावे? ज्या मुलांची प्रतिकारशक्ती काम करत नाही अशांना लसीकरणात काय फरक केला पाहिजे?

८) होमिओपथी, पर्यायी उपचार याचा प्राथमिक रोगप्रतिकारक शक्ती नसलेल्या मुलांना काय फायदा होतो? अशा मुलांना काही प्रतिकारशक्ती वाढवणारी औषधे दिली तर फायदा होतो का?

९) भारतामध्ये रोगप्रतिकारक शक्ती नसलेल्या मुलांसाठी उपचाराचे कोणते पर्याय उपलब्ध आहेत आणि ते कोठे उपलब्ध आहेत?

१०) भारतामध्ये अशा रोगप्रतिकारक शक्ती कमी असलेल्या रुग्णांसाठी काही आधारगट आहेत का?

११) सर्वसाधारणपणे आपल्या देशात मुलांमध्ये कोणत्या प्रतिकारशक्तीच्या कमतरतेचे रुग्ण आढळतात?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2021–2022**

**Piyush Gupta** IAP President 2021 | **Remesh Kumar R** IAP President-Elect 2021 | **Bakul Parekh** IAP President 2020 | **GV Basavaraja** IAP HSG 2020–2021 | **Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***


37

# प्रतिकारशक्ती कमतरता

प्रश्न
(१)

**इम्युनोडेफिशियन्सी म्हणजे काय? ती कशामुळे होते? एका मुलाला लागण झाल्यास ही प्रतिकारशक्तीची कमतरता दुसऱ्या मुलाला होऊ शकते का? काय केल्याने ते टाळता येते?**


प्रतिकारशक्ती आपल्याला जंतुसंसर्गापासून वाचवते. प्रतिकारशक्तीचे अनेक पैलू आहेत आणि प्रत्येक घटकाचा वेगवेगळ्या जंतूंना अटकाव करण्यासाठी उपयोग होत असतो.





आकृती १ : प्रतिकारशक्ती आपल्याला वेगवेगळ्या जन्तुंपासून संरक्षण देते

प्रतिकारशक्ती आपल्याला वेगवेगळ्या जंतूंपासून संरक्षण देत असताना जेव्हा या घटकांमधील एखादा घटक काम करत नाही तेव्हा आपण त्याला इम्युनोडेफिशियन्सी म्हणजे रोगप्रतिकारक अक्षमता असलेला असे म्हणतो. प्राथमिक रोगप्रतिकारक शक्ती

कमी असणे हा काही एकुलता एक आजार नाही. आपल्या रोगप्रतिकारक शक्तीचा कुठला घटक बिघडलेला आहे यावरून त्याचे वेगवेगळे वर्गीकरण केले जाते. आता चारशे पन्नासपेक्षा जास्त वेगवेगळ्या आजारांना या प्राथमिक रोगप्रतिकारक शक्ती क्षमता या छत्रीखाली घेण्यात आलेले आहे. त्यांची लक्षणे, त्यांचे उपचार आणि त्यांचे दूरगामी परिणाम वेगवेगळे आहेत. पण त्या सगळ्यांमध्ये एकच समाईक धागा आहे तो म्हणजे वरचेवर होणारी आणि दीर्घकाळ चालणारे जंतुसंसर्ग.




**आकृती २ :** प्रतिकारशक्तीच्या अनेक घटकांपैकी एकाही घटकाच्या कमतरतेमुळे प्राथमिक इम्युनोडेफिशियन्सी रोगप्रतिकारक अक्षमता होत असते).





**आकृती ३ :** प्राथमिक प्रतिकारशक्तीचा अभाव असलेल्या रुग्णांना वेगवेगळे आणि वरचेवर होणारे जंतुसंसर्ग होतात आणि हे जंतूसंसर्ग बरेच दिवस चालतात

या प्राथमिक रोगप्रतिकारक शक्तीच्या कमतरतेचा परिणाम हा त्याला कुठल्या प्रकारची प्राथमिक रोगप्रतिकारक शक्तीची कमतरता आहे यावर ठरत असते. काही प्रतिकारशक्तीचे अभाव इतके गंभीर असतात की त्यामध्ये पहिल्या काही महिन्यातच वेगवेगळी लक्षणे दिसायला लागतात. उदाहरणार्थ गंभीर संयुक्त कमतरता (SCID). यातले बरेचशी लहान मुले पहिल्या वर्षातच औषधोपचार नीट न मिळाल्यास दगावतात. मात्र काही प्राथमिक रोगप्रतिकारक शक्ती कमतरतेचे आजार हे सौम्य असतात आणि त्यांचे मोठेपणीदेखील निदान होऊ शकते.

प्रतिपिंडाची कमतरता म्हणजे अँटीबॉडीडेफिशियन्सी हा जगभरात दिसलेला प्राथमिक रोगप्रतिकारक शक्ती कमतरतेचा सर्वात मोठा गट आहे. या गटामध्ये मुलांमध्ये विशिष्ट प्रथिने प्रतिपिंड म्हणजे अँटीबॉडीज नसतात. या प्रतिपिंडांचा उपयोग जंतूंना मारण्यासाठी होतो आणि त्यामुळे ते आपल्याला जंतुसंसर्गापासून वाचवत असतात. ज्या मुलांना या प्रतिपिंडांचा अभाव असतो. ती मुले वरचेवर जंतुसंसर्गांना तोंड देत असतात.



Ch-037.indd 4 07-10-2021 12:18:33




**आकृती ४ :** प्रतिपिंड आपल्याला जंतूंना मारण्याला मदत करत असतात आणि आपला जंतुसंसर्गापासून बचाव करत असतात)

पीआयडीचे प्राथमिक कारण बहुतांशी आपल्यास दोष गुणसूत्राकडे जाते. हे सदोष गुणसूत्र म्हणजे त्या मुलाच्या गुणसूत्रात झालेला नवीन बदल असू शकतो किंवा तो दोन्हीपैकी एकाच्या किंवा दोन्हीही पालकांच्या गुणसूत्रातून मुलाला मिळालेला असू शकतो. बरेचसे पीआयडी पूर्णपणे बरे करता येत नाहीत. पण योग्य ती काळजी घेतल्यास बरीचशी लहान मुले आणि अनेक प्रौढ खूप चांगल्या पद्धतीचे आयुष्य जगू शकतात.

पीआयडीचे कारण दोषी गुणसूत्रांमध्ये असल्यामुळे हे आजार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केले जातात. एका मुलाचा पीआयडी पुढच्या संततीमध्ये होईल का हे तो पीआयडी कोणत्या प्रकारचा आहे ह्यावर अवलंबून असते. अशा जन्माला न आलेल्या मुलाच्या बाबतीत अनेक केंद्रांमध्ये आपल्याला या तपासण्या करता येऊ शकतात. त्यासाठी तुम्हाला तुमच्या तज्ञ डॉक्टरांशी बोलावे लागेल.


प्रश्न (२)

## माझ्या मुलाला वरचेवर जंतुसंसर्ग होत असतो. त्याची प्रतिकारशक्ती नीट काम करत नाही या गोष्टीची मी काळजी करावी का?

हे सर्वस्वी त्या मुलाला कोणत्या पद्धतीचे जंतूसंसर्ग होतात यावर अवलंबून आहे. सर्वसाधारणपणे मुलांमध्ये एका वर्षात दहा ते बारा श्वसनमार्गाचे जंतुसंसर्ग (ज्यात ताप खोकला सर्दी दम लागणे अशा लक्षणे असतात), ही दिसून येतात, अशा जंतुसंसर्गाच्या बाबतीत प्रतिकारशक्तीचा अभाव असण्याची शंका घेण्याचे कारण नाही. जर तुमच्या मुलाची वाढ आणि विकास व्यवस्थितअसेल, एका जन्तुसंसर्गातून तो पाच ते सात दिवसात पूर्णपणे बरा होत असेल आणि दोन जन्तुसंसर्गाच्या दरम्यान तो सुदृढ दिसत असेल तर काळजी करण्याचे कारण नाही. पीआयडीमध्ये छातीमध्ये संसर्ग होतो कान किंवा सायनसमध्ये जंतुसंसर्ग होतो किंवा जुलाब सुरू होतात आणि लसींच्या गाठीचे जंतुसंसर्ग होतात.

जेफ्री मॉडेल फाऊंडेशनने दहा धोक्याच्या लक्षणांचा उल्लेख केला आहे ज्यामुळे प्रतिकारशक्तीचा अभाव असण्याची शक्यता दिसून येते या धोक्याच्या लक्षणांचा उल्लेख खालीलप्रमाणे –

- एक वर्षाच्या आत कानामध्ये चार किंवा जास्तवेळा जंतूसंसर्ग होणे.
- सायनस म्हणजे नाकाच्या भोवतीच्या हाडाच्या पोकळ्यामध्ये दोन किंवा जास्त वेळा जंतुसंसर्ग होणे.
- प्रतिजैविके म्हणजेच अँटिबायोटिकचा दोन किंवा जास्त महिन्यांसाठी करावा लागलेला वापर आणि त्यामुळे फार फरक न पडणे.
- एका वर्षात दोन किंवा दोनपेक्षा जास्तवेळा न्यूमोनिया होणे.
- एखाद्या मुलाचे वजन आणि वाढ व्यवस्थित न होणे
- वरचेवर होणारा त्वचेवरचा जंतूसंसर्ग किंवा वरचेवर होणारी गळवे
- तोंडामध्ये सतत बुरशीचा प्रादुर्भाव किंवा त्वचेवर होणारा वरचेवर बुरशीचा जंतुसंसर्ग
- शिरेतून टोचून प्रतिजैविके देऊन जंतुसंसर्ग बरा करण्याची गरज
- दोन किंवा अधिक वेळा खोलवर अवयवात झालेला जंतूप्रादुर्भाव तसेच शरीरभर पसरलेला जंतू संसर्ग. (सेप्टीसेमिया)
- कुटुंबात प्रतिकारशक्तीचा अभाव असलेला रुग्ण.




**आकृती ५:** जंतुसंसर्गाचे काही सर्वसाधारणपणे आढळून येणाऱ्या जागा

**या सर्व दहाच्या दहा गोष्टी आकृतीमध्ये दाखवल्या आहेत**




**आकृती ६:** प्राथमिक प्रतिकारशक्तीचा अभाव असल्याची धोक्याची लक्षणे जेफरी मॉडेल फाउंडेशनने विकसित केलेली त्याचा स्त्रोत २०१६ जेफरी मॉडेल फाउंडेशन यांच्याकडून परवानगी घेऊन केला आहे.

जर तुमच्या मुलामध्ये यापैकी दोन किंवा त्यापेक्षा जास्त धोक्याची लक्षणे आढळली तर तुम्ही तुमच्या डॉक्टरांबरोबर निश्चित बोलणे गरजेचे आहे आणि त्यांच्याकडे पीआयडी असण्याची शक्यता व्यक्त केली पाहिजे.

प्रतिकारशक्ती कमतरता

त्याचप्रमाणे नेहमीपेक्षा वेगळ्या जंतूंनी होणारे जंतुसंसर्ग, आवश्यकतेपेक्षा जास्त गंभीर होणारा जंतुसंसर्ग आणि नेहमीपेक्षा इतर ठिकाणी आणि इतर जंतुसंसर्गापेक्षा जास्त वेळाने बरे झालेले जंतुसंसर्ग या सगळ्यांमध्ये पीआयडीबद्दल काळजी करणे गरजेचे आहे.




**आकृती ७ :** प्राथमिक प्रतिकारशक्तीच्या अभावात होणारे जंतुसंसर्ग.

जंतूसंसर्ग हा पीआयडीचा सर्वात सर्वसाधारणपणे आढळून येणारा प्रकार असला तरी इतर लक्षणे उदाहरणार्थ सांधेदुखी, सूज, त्वचेवर येणारे चट्टे किंवा विनाकारण होणारा तांबड्या पेशींचा नाश हे देखील आपल्याला पाहायला मिळते ही सर्व लक्षणे जेव्हा आपले शरीर आपल्याच पेशीविरुद्ध काम करते (ज्याला आपण ऑटॉइम्मुनिटी असे म्हणतो) तेव्हा पाहायला मिळतात.

**प्रश्न (३)**

## माझ्या मुलाला कोणकोणत्या प्रकारचे जंतुसंसर्ग होऊ शकतात? मी त्याला हॉस्पिटलमध्ये कधी घेऊन जावे? पालक या ना त्याने मी हे जंतुसंसर्ग टाळण्यासाठी काय करू शकतो?

पीआयडीच्या पालकांनी सतत सजग राहणे अत्यंत गरजेचे असते आणि आपल्या मुलाला जंतुसंसर्गाची काही लक्षणे उदाहरणार्थ: ताप, घशाला सूज, शरीरावर कुठेही आलेली सूज, हालचालीत आलेले बदल व चिडचिडेपणा, भूकमंदावणे, जुलाब अथवा उलट्याही सुरू झाल्यास ताबडतोब आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधावा. बाकी इतर लक्षणे आपल्या शरीराच्या कुठल्या भागांमध्ये जंतुसंसर्ग होतो यावर अवलंबून असतात. या सर्वजं बाकी इतर लक्षणे आपल्या शरीराच्या कुठल्या भागांमध्ये जंतुसंसर्ग होतो यावर अवलंबून असतात. या सर्व जंतुसंसर्गासाठी हॉस्पिटलमध्ये भरती होणे गरजेचे नसते. तुमचे डॉक्टर तपासून हा जंतूसंसर्ग घरच्याघरी उपचार करता येईल की त्याला हॉस्पिटलमध्ये भरती करावं लागेल याचा निर्णय घेऊ शकतात.

अतिशय महत्त्वाची गोष्ट ही की आपल्या मुलाचे सर्व वैद्यकीय तपासण्याची कागदपत्रे ही सुरक्षित आणि सहज उपलब्ध होतील अशा ठिकाणी ठेवावी, म्हणजे बाळाला हॉस्पिटलमध्ये भरती करतेवेळी त्याचा उपयोग होईल. शाळेच्या अधिकाऱ्यांनादेखील आपल्या मुलाच्या वैद्यकीय परिस्थितीबद्दल सांगून ठेवावे. पालक या नात्याने तुम्ही स्वतः आपल्या मुलाला चांगल्या आरोग्यदायी सूचना देणे गरजेचे आहे आणि त्या स्वतः देखील पालन करणे गरजेचे आहे. या काही आरोग्यदायी आयुष्याच्या महत्त्वाच्या टिप्स





Ch-037.indd 7 07-10-2021 12:18:33

- जेवणापूर्वी हातधुणे, बाहेरुन खेळून आल्यावर आणि कुठल्याही पाळीव जनावराला हाताळल्यानंतर हात स्वच्छ धुणे आणि शौचाला जाऊन आल्यावरती हात स्वच्छ धुणे हे नेहमीच करायला हवे. हात साबणाने आणि पुरेशा पाण्याने कमीत कमी ३० सेकंद धुवावेत.
- जर हात धुणे शक्य नसल्यास अल्कोहोल बेसचा सानिटायाझार वापरावा
- आपल्या सर्व कुटुंबियांना आणि मित्रांना हात धुण्याच्या बाबतीत आपण आग्रही राहावे आणि त्यांना प्रोत्साहित करावे जेणेकरून आपल्या मुलाला जंतुसंसर्ग होणार नाही
- कुठलीही जखम साबणाने आणि पाण्याने स्वच्छ धुवावी आणि त्यावर योग्य ते अँटीसेप्टीक लावावे
- सर्व लसीकरण त्याच्या वयानुसार पूर्ण करावे यासाठी तुमच्या प्रतिकार शक्तीतज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा
- जशा खाण्याच्या चांगल्या सवयी या प्रत्येकालाच महत्त्वाच्या आहेत तशा त्या पीआयडीच्या मुलांना खूपच जास्त महत्त्वाच्या आहेत. जसे या मुलांना एक संतुलित आहार त्यांच्या सामान्य वाढ आणि विकासासाठी गरजेचा असतो त्याचप्रमाणे आरोग्यदायी आणि अन्नाच्या स्वच्छतेबाबतसुद्धा आग्रही राहणे गरजेचे आहे, जेणेकरून अन्नातून विषबाधा होण्याची शक्यता कमी होईल
- पाणी पिण्यापूर्वी उकळलेच पाहिजे उकळलेले पाणी फ्रिजमध्ये ठेवता येते किंवा खोलीतील तापमानाला २४ तास ठेवता येते मात्र या ठेवलेल्या पाण्यावर झाकण हवेच. पीआयडी असलेल्या मुलांनी सर्व नेहमीचे पदार्थ खायला हरकत नाही मात्र जंतूंविषयी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे कारण त्यांना वरचेवर जंतूसंसर्ग होऊ शकतो. शक्यतो कच्चे किंवा न शिजवलेले पदार्थ खाऊ नयेत.
- सर्व खेळणी स्वच्छ धुवावी. –




**आकृती ८ :** पीआयडीच्या मुलांसाठी महत्त्वाच्या आणि उपयोगी आरोग्यदायी सूचना.

प्रश्न (४)

## प्राथमिक प्रतिकारशक्तीचा अभाव असलेल्या माझ्या मुलाला मी शाळेत पाठवू शकतो का?

पीआयडी असलेल्या मुलांना शाळेत पाठवायला हरकत नाही त्यांच्या आत्मविश्वासासाठी ते महत्त्वाचे आहे. वरचेवर हॉस्पिटलमध्ये जायला लागल्यामुळे आणि कधीकधी जंतुसंसर्ग झाल्यामुळे त्यांची शाळा बुडणे हा महत्त्वाचा मुद्दा होऊ शकतो. तरीदेखील पीआयडी असलेली अनेक मुले पालक आणि शाळेच्या मदतीने त्यांच्या शालेय अभ्यासक्रमात चांगली कामगिरी करू शकतात.

पालकांच्यादृष्टीने शाळा शिक्षक समुपदेशक, आणि अधिकारी यांना भेटून आपल्या मुलाच्या प्रकृतीबद्दल आणि आजारामुळे त्याच्या शाळेतील संभाव्य गैरहजेरीबद्दल आणि काही हालचालींमध्ये असलेल्या मर्यादाबद्दल बोलणे गरजेचे आहे




**आकृती ९ :** प्राथमिक प्रतिकारशक्तीचा अभाव असलेल्या मुलांमध्ये अनेक गोष्टी करण्याची क्षमता असते

पी आय डी असलेल्या मुलांच्या चांगल्या आरोग्यदायी सवयींच्या सुचना चांगल्या आरोग्यदायी सवयींचा शाळेमध्ये वापर केला जातो की नाही हे पाहावे. हात धुणे आणि श्वसन मार्गाची स्वच्छतादेखील पाळली पाहिजे. आजारी मुलांपासून निश्चितच दूर राहावे.



Ch-037.indd 9 07-10-2021 12:18:34

प्रश्न (५)

## माझ्या मुलाला बाहेर खेळायला परवानगी आहे का?

- पीआयडी असलेली मुले व्यायामात आणि खेळात आवडीने सहभाग घेऊ शकतात आणि त्यांना त्याचा रस घेण्यास प्रोत्साहित करावे.
- बाकीच्या मुलांप्रमाणे तीदेखील खेळू शकतात. काही विशिष्ट पीआयडी उदाहरणार्थ सीजीडी या आजारांमध्ये मुलांनी तलावात, डबक्यात पोहायला जाणे टाळावे आणि बागकामदेखील टाळावे.
- काही पीआयडीमध्ये रक्त गोठण्याच्या प्रक्रियेमध्ये बिघाड असतो आणि अशांनी संपर्क येईल अशा पद्धतीचे खेळ टाळावेत

प्रश्न (६)

## मी माझ्या मुलांना सुट्टीवर घेऊन जाऊ शकतो का? त्याबाबत तुम्ही काय काळजी घ्यावी?

पीआयडी असलेल्या मुलांनी सुट्टी आणि प्रवास करायला काही हरकत नाही. मात्र काही काळजी घेणे गरजेचे आहे. जर तो मुलगा परदेशी जाणं असेल तर तुम्ही तुमच्या डॉक्टरांना पूर्व कल्पना द्यावी. काही देशात प्रवास करतांना काही विशिष्ट आजारांसाठी लसीकरण करणे गरजेचे असते. तुमचे डॉक्टर तुम्हाला सांगतील ती लस तुमच्या मुलासाठी निर्धोक आहे किंवा कसे. जर ही लस घेणे धोकादायक असेल तर तुमचे डॉक्टर तुम्हाला त्यापासून सूट असल्याचे सर्टिफिकेट देतील. प्रवास करताना खाण्याच्या आरोग्याबद्दल काळजी घेणे गरजेचे आहे. कुठल्याही ठिकाणी न उकळलेले पाणी वापरू नये, ज्यात बर्फाच्या खड्यांचा समावेश होतो. पालकांना त्या जागेच्या आरोग्य संस्थांबद्दल माहिती असणेग रजेचे आहे, जेणेकरून मुलाला प्रवासात काही त्रास झाल्यास तिथे ताबडतोब संपर्क करता येऊ शकेल.

**काही महत्त्वाच्या सूचना :**

- औषधे आणि इतर गरजू गोष्टींचा साठा हाताशी सहज येईल अशा पद्धतीने ठेवावा.
- तुमची औषधे त्याच्या मूळ कंटेनरमध्ये ठेवून त्याबरोबर योग्य ते प्रिस्क्रिप्शन बाळगावे.
- उकळलेले पाणी प्यावे
- मांस, पोल्ट्री, शंखशिंपले आणि मासे खाताना ते पूर्ण शिजले आहेत याची खात्री करावी
- फळे आणि भाज्या स्वच्छ धुतलेल्या आणि साले काढलेल्या असाव्यात
- तुमच्या इम्युनॉलॉजिस्टशी संपर्क सतत ठेवावा
- तुमचे इन्शुरन्स कार्ड सतत बरोबर बाळगा

प्रश्न
(७)

**माझ्या मुलाच्या लसीकरणामध्ये आणि प्रतिकारशक्तीची कमतरता नसलेल्या इतर मुलांच्या लसीकरणामध्ये काय फरक असला पाहिजे?**

तुमच्या मुलाला काही ज्यादाची लस द्यायला लागू शकते किंवा त्यांना काही लसी टाळाव्या लागतील. तुमचे तज्ञ डॉक्टर ह्याबाबत तुमच्याशी चर्चा करतील आणि तुमच्या मुलासाठी कोणती लस निर्धोक आहे याबद्दल तुम्हाला सल्ला देतील. पीआयडीच्या मुलांच्या घरातील इतर कुटुंबीयांना नेहमीची लस घेणे गरजेचे आहे. जेणेकरून या मुलांना ते जंतुसंसर्ग होणार नाहीत. यात फ्लू लसीचा समावेश आलाच. याबाबत तुमचे डॉक्टर तुम्हाला योग्य तो सल्ला देतील.

काही लसीकरणाच्या बाबतीत मात्र थोडीशी बंधने येऊ शकतात. याबाबत तुम्हाला डॉक्टर तुमच्याशी चर्चा करतील. जर तुमच्या अगोदरच्या मुलाला पीआयडीचा त्रास असल्यास आणि तुम्हाला पुढचे मूल होत असल्यास जन्माच्यावेळी ताबडतोब त्या मुलाचे लसीकरण न करता सर्वप्रथम त्याला डॉक्टरांनी तपासून घ्यावे

प्रश्न
(८)

**होमिओपथी, पर्यायी उपचारपद्धती याचा प्राथमिक रोगप्रतिकारक शक्ती नसलेल्या मुलांना काय फायदा होतो? अशा मुलांना काही प्रतिकारशक्ती वाढवणारी औषधे दिली तर चालतात का?**

होमिओपॅथी पूरक किंवा पर्यायी उपचारपद्धती करणारी तज्ञ मंडळी या आजारांमध्ये प्रतिकारशक्ती वाढवू शकतो किंवा तो आजार बरा करू शकतो असा दावा करतात. मात्र याला पुरेसा शास्त्रीय डाटा किंवा संशोधन उपलब्ध नाही.

त्यामुळे त्याच्या उपचारपद्धतीच्या परिणामकारकतेबद्दल किंवा निर्धोकतेबद्दल आपण भाष्य करणे चुकीचे ठरेल. जी प्रतिकारशक्ती नीट काम करत नाहीत त्यामध्ये कोणतेही इम्यूनबूस्टर मदत करू शकत नाही.

चांगला आहार, पुरेसा व्यायाम आणि पुरेशी झोप हे मात्र निश्चित गुणकारी ठरू शकते.





Ch-037.indd 11 07-10-2021 12:18:34

प्रश्न
(९)

## वा एक एखाद्या मुलाला प्रतिकारशक्तीच्या अभावाने जे आजार होतात त्यासाठी भारतात उपचाराचे काय पर्याय उपलब्ध आहेत आणि या सुविधा कोठे उपलब्ध आहेत?

**पीआयडीचा उपचार हा पीआयडी कोणत्या पद्धतीचा आहे यावर अवलंबून असतो.**

पीआयडीमधील जगात सर्वात मोठा गट म्हणजे प्रतिपिंड कमतरता अर्थात अँटीबॉडीडेफिशियन्सी. अँटीबॉडीज या विशिष्ट प्रकारच्या प्रथिनांमुळे आपल्याला जंतूप्रादुर्भावापासून संरक्षण मिळते. जर आपणही प्रतिपिंडे रुग्णांना दिली तर त्यामुळे रुग्णांना जंतुसंसर्ग होत नाही. याला इम्युनोग्लोब्युलिन रिप्लेसमेंट थेरपी असे म्हणतात. ही इम्युनोग्लोब्युलिन महिन्यातून एकदा शिरेवाटे दिली जातात. याचबरोबर यातल्या काही रुग्णांना अँटिबायोटिक म्हणजे प्रतिजैविकांचा एक छोटा डोसदेखील दिला जातो, जेणेकरून जंतूंचा प्रादुर्भाव टाळण्यात येतो. समजा हे सर्व करूनसुद्धा जंतुसंसर्ग जर झालाच तर त्या जंतुसंसर्गाला लवकरात लवकर आणि अतिशय प्रभावी औषधे वापरून आटोक्यात आणावे लागते.

काही इतर पीआयडीमध्ये रुग्णाला प्रतिजैविके आणि किंवा बुरशीनाशक औषधे द्यावी लागतात, जेणेकरून जंतुसंसर्ग टाळता येतो. अनेकदा ही औषधे रोज द्यावी लागतात. काही विशेष पीआयडीमध्ये हिमोपॉएटिक्स्टेमसेल प्रत्यारोपण करावे लागते. स्टेमसेल या आपल्या मूळपेशी असतात ज्यातून वेगवेगळ्या प्रतिकारशक्तीच्या पेशी निर्माण होत असतात. हे प्रत्यारोपण आपला प्रतिकारशक्तीचा मुख्य दोष दुरुस्त करण्याचे काम करतो आणि ज्या पेशी आजारी असतात त्यांना बदली करून सशक्त स्टेमसेल्स दिल्या जातात मात्र ही स्टेमसेल प्रत्यारोपण हे प्रत्येकवेळी उपयोगी पडत नाही. तुम्ही तुमच्या इम्युनोलोंजिस्टशी बोलून या पद्धतीचे प्रत्यारोपण आपल्या मुलाच्या आजारासाठी उपयोगी आहे की नाही हे ठरवा.

इम्युनोलोंजीक्लिनिक्स भारतामध्ये अनेक केंद्रात उपलब्ध आहेत. त्याची अद्ययावत यादी या संकेत स्थळावर उपलब्ध आहे संकेत स्थळ https://fpid.org/wp/fpid-centers-in-india/ आणि माहिती इंडियन सोसायटी फॉर प्रायमरी नोटिफिकेशनसी आयएसपीआयडी जे फाउंडेशन फॉर प्रायमरी आयडी http://ispid.org.in/अमेरिकेशी संधान बांधून काम करत आहे





Ch-037.indd 12 07-10-2021 12:18:34

## प्रश्न (१०)

## प्रतिकारशक्तींच्या दोषांवर काम करणारा रुग्णांचा आधारगट भारतामध्ये कुठे कार्यरत आहे का?

प्राथमिक प्रतिकारशक्ती अक्षमता हा दुर्मिळ आजार आहे आणि त्याबद्दल भारतामध्ये सर्वसाधारण जनतेत आणि खुद्द डॉक्टर वर्गातदेखील पुरेशी जागरूकता नाही. एक ऑनलाईन गोष्ट मुलांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी या साइटवर उपलब्ध आहे.

असे काही वकिली गट भारतात आहेत जे प्रायमरी इम्युनोडेफिसायन्सी असलेल्या मुलांच्या कुटुंबीयांची संधान साधून काम करतात http://pinsa.org.za/wp-content/uploads/2014/10/Kids-Our-Immune-System.pdf

- इंडियन पेशंट सोसायटी फॉर पीआयडी आयपीएसपीआय भुवनेश्वर येथे प्रस्थापित
- प्रायमरी इम्युनोडेफिसायन्सी पेशंट वेल्फेअर सोसायटी ईडब्ल्यूएस बेंगलोर येथे स्थित
- इंटरनॅशनल पेशंट ऑर्गनायझेशन प्रायमरी हा पेशंट अडवोकॅसी ग्रुप पीआयडी असलेल्या मुलांच्यासाठी सर्व जगभर काम करतो आणि त्यात भारताचादेखील अंतर्भूत समावेश आहे.

या सर्व संघटना पीआयडी असलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात चांगले दिवस यावेत यासाठी काम करत असतात.

## प्रश्न (११)

## भारतामध्ये कोणत्या पद्धतीचे प्रतिकारशक्तीचे आजार सर्वसाधारणपणे आढळतात?

पूर्वी चर्चा केल्याप्रमाणे भारतामध्ये ४५०पेक्षा जास्त पीआयडी माहीत आहेत. सुदैवाने यातले केवळ काहीच आजार हे बहुतांश पीआयडीसाठी कारणीभूत आहेत. आपण आता काही सर्वसाधारण आजारांबद्दल थोडक्यात चर्चा करूया :

- प्रतिपिंड कमतरता हा सर्वात जास्त वेळा दिसून येणारा गट वर्ग जगभर आढळत आहे. प्रतिपिंडे ही आपल्या शरीरात तयार झालेला घटक असून तो आपल्याला जंतूसंसर्गाशी लढा देण्यास मदत करतात. आपल्याला जी नेहमी प्रतिपिंड कमतरता बघायला मिळते त्यात एक्सलिंक्ड अगामाग्लोबुलीनेमिया आहे यात शरीर गुणसूत्रांमधील या दोषांमुळे प्रतिपिंडे तयार करू शकत नाही. या मुलांना वरचेवर कान, सायनसेस आणि छातीचा जंतुसंसर्ग होत असतो. बरेचदा निदान व्हायच्या अगोदर या अनेक मुलांना अनेक प्रती जैविके म्हणजे अँटिबायोटिक्स कोर्स

मिळालेला असतो ह्या मुलांना प्रतिपिंडाचा पुरवठा दरमहिन्याच्या इंजेक्शनमधून देता येतात. मात्र ही उपचारपद्धती महागडी असून ते आयुष्यभर घ्यावी लागते. योग्यवेळी केलेले निदान त्या मुलाला चांगले आयुष्य देऊ शकते, कारण वरचेवर होणारा छातीतला जंतूसंसर्ग तुमच्या फुफ्फुसाला कायमची इजा करू शकतो

- गंभीर संयुक्त प्रतिकार अक्षमता एससीआयडी हा मात्र अतिशय गंभीर प्रतिकारशक्तीचा आजार असून त्याच्यामुळे वर्षाच्या आतच मृत्यू ओढवतो. या मुलांना नेहमीपेक्षा वेगळ्या जंतूंमुळे जंतुसंसर्ग होतो आणि योग्य ते औषध योग्य त्या वेळासाठी देऊनसुद्धा हे जंतुसंसर्ग पूर्णबरे होत नाहीत. मात्र लवकरात लवकर केलेले हेमोपोएटिकस्टेमसेल प्रत्यारोपण त्यांचा जीव वाचवू शकतो.
- क्रॉनिक ग्रॅन्युलोमॅटसडिसीज हा एक प्रतिकारशक्तीच्या कमतरतेचा आजार असून यात काही विशिष्ट पेशी, ज्या जंतु मारण्याचे काम करतात, त्या दोषी असतात. त्यामुळे जंतू नीट मरत नाहीत. कोणत्याही वयामध्ये असा जंतुसंसर्ग होऊ शकतो. अश्या आजारात नेहमीपेक्षा वेगळे जंतू आजाराला कारणीभूत ठरू शकतात. यात सर्वसाधारणपणे आढळणारे जंतुसंसर्ग म्हणजे त्वचा, मानेतल्या लसीच्यागाठी, काखेतल्या आणि जांघेतल्या लसीच्यागाठी. यातली काही मुले आयुष्यभरासाठी औषधे घेऊन जंतुसंसर्ग टाळून चांगले जगू शकतात. मात्र काही जणांना लवकरात लवकर हेमोपोएटिकस्टेमसेल प्रत्यारोपण करावे लागते.
- विस्कोट अल्ड्रीचसिंड्रोम हा एक गंभीर प्रतिकारशक्तीचा आजार असून तो मुलांमध्ये होतो. या मुलांमध्ये पहिल्या वर्षांमध्ये त्वचेवर अतिरक्त स्त्राव आणि शौचावाटे रक्तजाणे हे दिसून येते. त्वचेला होणारा इसबही सर्वसाधारणपणे आढळून येतो. या मुलांनादेखील वरचेवर जंतुसंसर्ग होतो आणि त्यांची शरीराची प्रतिकारशक्ती त्यांच्याविरुद्ध काम करते. हेमोपोएटिकस्टेमसेल प्रत्यारोपण हा या आजाराचा एकमेव व माहीत असलेला रामबाण उपाय होय.

## महत्त्वाचे मुद्दे

- आपली प्रतिकारशक्ती ही आपल्या शरीराची जंतूविरुद्ध सर्वात महत्त्वाची लढा देणारी संस्था आहे त्याला अनेक घटक आहेत आणि त्यातला एकही घटक खराब काम करत असल्यास आपल्याला प्रतिकारशक्तीचा अभाव निर्माण होतो
- अनेक प्रतिकारशक्तीचे आजार हे अनुवंशिक असतात आणि ते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीला संक्रमित केले जातात आणि पीआयडीचे सर्वात महत्त्वाचे लक्षण म्हणजे वरचेवर आणि प्रदीर्घ काळ चालणारे जंतुसंसर्ग
- काही पीआयडी खूप गंभीर असतात आणि आपण योग्यवेळेस उपचार केले नाहीत तर त्यामुळे वर्षाच्या आत मृत्यू येऊ शकतो. काही इतर पीआयडी मात्र सौम्य स्वरूपात असतात आणि ते अनेकदा प्रौढ वयातदेखील होऊ शकतात.
- योग्य तो आहार, पुरेसा व्यायाम, पुरेशी झोप आणि वैयक्तिक स्वच्छता हे पीआयडी असलेल्या प्रत्येक मुलाच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यामुळे वरचेवर होणाऱ्या जंतुसंसर्गावर ताबडतोब उपचार केले पाहिजेत. प्रत्येक पीआयडीसाठीची विशिष्ट उपचारपद्धती ही त्या त्या पीआयडीच्या आजाराप्रमाणे बदलत असते